UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

## पुरवणी अंक ४२ – मार्च २०२४ (त्रैमासिक)

● शके १९४५ ● वर्ष : ९१ ● पुरवणीअंक : ४२

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्राचार्य डॉ.लालसिंग खालसा ● प्रा.डॉ.किशोर वासुर्के ● प्रा.डॉ.गजेंद्र कढव

**❊ प्रकाशक ❊**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
ई–मेल : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

अंक मूल्य ₹ १००/–
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/–; सदस्यता वर्गणी : रु. २५००/–

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१ **आदिवासी स्त्रियांचा दर्जा आणि आरोग्य समस्येचे अध्ययन** - डॉ.सुषमा जाधव ------------ ५

२ **अंधश्रद्धा आणि आदिवासी महिलांचे सबलीकरण : एक सामाजिक, सांस्कृतिक दृष्टिकोन.**
- डॉ.कविता मते ------------------------------------------ १०

३ **सदानंद देशमुख यांच्या बारोमास कांदबरीतील स्त्री चित्रण** - डॉ.प्रीती खोब्रागडे. ----------- १३

४ **आदिवासी महिलांच्या शैक्षणिक समस्या एक अध्ययन**
- डॉ.कौशल्या खिल्लारे. ---------------------------------------- १७

५ **आदिवासी महिलांच्या आरोग्य विषयक स्थितीचा एक सामाजिक दृष्टिकोन**
- डॉ.एस. के. बल्लोरे. ------------------------------------------ २०

६ **आदिवासी महिला सक्षमीकरण प्रश्न, आव्हाने आणि स्थिती**
- डॉ.कामराज रामटेके. ---------------------------------------- २५

७ **वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी गाडगेबाबा यांचे ग्रामीण स्त्री सक्षमीकरणातील योगदान : एक समाजशास्त्रीय अध्ययन** - डॉ.अमोल ठाकरे. --------------------------- २९

८ **महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील स्त्रियांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन**
- डॉ.सुप्रीया देसाई. ------------------------------------------- ३२

९ **साहित्यातील स्त्री आणि महिलासबलीकरण** - डॉ.ज्योती सूर्यवंशी. ------------------ ३५

१० **महाराष्ट्रातील आदिवासी स्त्री** - डॉ.प्रमिला भुजाडे. --------------------------- ३८

११ **Tribal Women in India: Issues, Challenges and Perspectives**
**- Dr. Gajendra Kadhav.** --------------------------------------- ४२

१२ **आदिवासी स्त्रियांची सामाजिक भूमिका** - डॉ.सौ.उज्वला मोकदम. ----------------- ४६

१३ **आदिवासी स्त्री आणि आदिवासींसाठी नवे राष्ट्रीय धोरण** - डॉ.नरेश धुर्वे. --------------- ४९

१४ **आदिवासी महिलांचे सक्षमीकरण आणि वास्तव** - डॉ.सरला मेश्राम. ----------------- ५४

१५ **आदिवासी महिला सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका** - डॉ.अनिता सार्वे. -------------- ५७

१६ **संत साहित्यातील स्त्री** - डॉ.स्वाती वाकोडे. ---------------------------------- ६२

१७ **Role of Library & Information Centres in Women Empowerment with the help of ICT**
**- 1) Dr.Kishor Wasurke; 2) Dr.Ramanik Lengure.** -------------------- ६६

१८ **महिला सक्षमीकरणात सार्वजनिक ग्रंथालयाची जबाबदारी** - डॉ.पौर्णिमा गंथडे. ----------- ७१

१९ **आदिवासी समाजातील स्त्रियांच्या आरोग्याची स्थिती** - डॉ.विलास चव्हाण. ------------- ७६

२० **स्त्रीवादी चळवळी आणि आदिवासी महिलांचे सक्षमीकरण** - प्रा.कल्पना गोडघाटे. --------- ७९

२१ **आदिवासी स्त्रियांच्या संदर्भात सरकारची भूमिका** - डॉ.बबीता थूल. ---------------- ८३

२२ **अस्थायी महिला गिरणी कामगाराच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन** - प्रा.प्रमोद वानखेडे. ------ ८७

२३ **आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात शैक्षणिक भूमिका -एक दृष्टिक्षेप** - डॉ.विठ्ठल चव्हाण. --- ९०

२४ **आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा व त्यांच्या समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन**
- प्रा.धर्मदास घोडेस्वार. --------------------------------------- ९३

२५ **वारकरी पंथातील स्त्री संत आणि संत तुकारामांच्या साहित्यातील स्त्री**
– डॉ.श्रीकांत पानघाटे. ------------------------------------------ ९७
२६ **भारतातील आदिवासी महिलांचे सक्षमीकरण** – प्रा.लामेश बावनकुळे. ---------------- १००
२७ **ब्रिटीश वसाहतवाद व भारतीय आदिवासी महिला** – प्रा.संजय गिरडकर. -------------- १०३
२८ **हलबा जमातीचे संत श्री काशिनाथ महाराज अवतार कार्य**– प्रा.महेंद्र कुंभारे.------------- १०८
२९ **राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्त्रीविषयक विचार** – डॉ.विजय रैवतकर. ---------------- ११२
३० **कर्करोग आणि स्त्रियांचे मानसिक आरोग्य एक आढावा**
– १) विभावरी नखाते, २) डॉ.उषा खंडाळे. ------------------------------ ११६
३१ **महिला समुपदेशन केंद्र आणि महिला** – १) प्रा.इंदू साळुंखे; २) प्रा.डॉ.वेदप्रकाश मलवाडे. -- ११९
३२ **आदिवासी महिला सक्षमीकरणात पंचायतराजची भूमिका**
– १) श्री. संतोष चलाख; २) प्रा. डॉ. सौ. अभय लाकडे. --------------------- १२४
३३ **जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कादंबरीवर पडलेला प्रभाव**
– १) श्री. पिराजी कांदे; २) डॉ. गजानन कोर्तलवार. ----------------------- १२८
३४ **गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात गडचिरोली पोलीस प्रशासनाचे योगदान**
– १) श्री. आशिष येल्लेवार; २) प्रा. डॉ. पंढरी वाघ. ----------------------- १३१
३५ **नागभीड तालुक्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील स्त्रियांचे पोषण व आरोग्य – एक अध्ययन**
– १) वैशाली वासेकर; २) प्रा.डॉ.माधुरी कोकोडे. ------------------------- १३५
३६ **उषाकिरण आत्राम यांच्या 'शिकार फत्ते झाली' या कथासंग्रहातील आदिवासींचे वास्तव दर्शन**
– १) कु.बारू उईके; २) प्रा.डॉ. नरेंद्र आरेकर. --------------------------- १४०
३७ **अरुणा सबाने यांच्या 'विमुक्ता' कादंबरीतील समाज वास्तव**
– १) कु. निशा कापकर, २) प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर. ------------------------ १४३
३८ **भटक्या बहुरूपी जमातीतील स्त्रियांच्या शिक्षणातील समस्या**
– १) कु.प्रिती नैताम, २) प्रा.डॉ.स्निग्धा कांबळे. -------------------------- १४६
३९ **वर्धा जिल्ह्यातील पीक विमा घेतलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई करिता केलेल्या दाव्याबाबत प्रतिक्रियांचे चिकित्सक अध्ययन** – १) सपना गजभिये; २) डॉ. श्री. पराग कावळे ------- १५०
४० **गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोककला संस्कृती – समाजशास्त्रीय अध्ययन**
– १) कु. जयाबाई मडावी, २) प्रा. डॉ. अभय लाकडे.---------------------- १५४
४१ **तिसऱ्या जगाच्या विजेत्या: इंदिरा गांधी आणि १९८३ ची NAM परिषद**
– १) शार्दूल अडबाले; २) प्रा. डॉ. संजय गोरे ---------------------------- १५८
४२ **अण्णाभाऊ साठे यांच्या कथेमधील विद्रोही स्त्रीपात्र**
– १) सतिष डांगे; २) प्रा.डॉ.पद्माकर वानखेडे.---------------------------- १६२
४३ **बहुरूपी लोककला आणि संस्कृती** – १) भूमेश्वर शेंडे; २) प्रा. डॉ. नरेंद्र आरेकर. ------- १६६
४४ **विर जातीतील महिला सशक्तीकरणासाठी शासकीय योजना**
– १) सचिन खेडकर; २) प्रा. डॉ. गजेंद्र कढव ---------------------------- १७०
४५ **स्त्री समाजसेविकांच्या आत्मचरित्रातील आदिवासी स्त्री**
– १) कु.भारती गेडाम; २) डॉ.विलास खुणे. ----------------------------- १७४

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्त्रीविषयक विचार

**डॉ. विजय रैवतकर**
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी, जिल्हा गडचिरोली

**सारांश :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे स्त्रियांसंबंधीचे विचार पुरोगामी आहेत. ग्रामगीतेतून त्यांनी स्त्रियांच्या क्षमतेवर विश्वास दाखवला. स्त्री शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला. शिक्षणामुळे मुली, स्त्रिया धीट होतात यावर त्यांचा विश्वास होता. स्त्रियांच्या उन्नतीसाठी त्यांनी सातत्याने विचार मांडले. स्त्री-पुरुष समानतेच्या विरोधी असणाऱ्या पुरुषी अहंपणाला व पुरुषसत्ताक व्यवस्थेला त्यांनी प्रश्न विचारून समाजाला प्रबोधित केले. समाजातील स्त्रियांच्या संदर्भात असणाऱ्या पारंपरिक मानसिकते विरुद्ध त्यांनी प्रहार केला. स्त्रियांना गतवैभव प्राप्त व्हावे, स्त्रियांचे सबलीकरण व्हावे, स्त्रियांनी संघटन करून प्रतिकाराची शक्ती निर्माण करावी, मुला-मुलींमधील भेद नाहीसा व्हावा, अशी स्त्रीविषयक विकासवादी भूमिका तुकदोजी महाराजांची होती. महाराजांनी स्त्रियांच्या वैचारिक प्रगल्भतेलामहत्त्व दिले. स्त्रियांच्या संदर्भातील महाराजांचे विचार क्रांतिकारी स्वरूपाचे असून स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत.

**बीज शब्द :**

स्त्री, महिलोन्नती, सक्षमीकरण, सबलीकरण.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राला संतांची थोर परंपरा लाभली. संत ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत अनेक जाती धर्मातील संतांनी सर्वसामान्य जनतेला आत्मोद्धाराचा आणि सामाजिक विकासाचा मार्ग दाखवला. राष्ट्रसंत तुकडोजी हे संतांच्या थोर परंपरेतील; विदर्भाच्या कुशीत जन्मलेले अनमोल रत्न होत. त्यांचे मूळ व्यक्तिमत्त्व आध्यात्मिक, ईश्वरपरायण तर होतेच पण त्याला आधुनिकतेचे विशेष परिमाण लाभले होते. ते क्रांतिदर्शी संतकवी होते. वंदनीय महाराजांची सामाजिक दृष्टी आधुनिक आणि प्रगत आहे. महाराष्ट्राला महात्मा फुल्यांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत सामाजिक सुधारकांची परंपरा लाभली. त्या सगळ्या चिंतकांच्या चिंतनाचे सार तुकडोजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात एकवटले होते. म्हणूनच त्यांनी वर्णधर्म, स्पृश्यास्पृश्यता, ग्रामोन्नती, महिलोन्नती, अनिष्ठ रूढी, विवाहपद्धती, अंधश्रद्धा यासंबंधी समाजपरिवर्तनवादी दिशादर्शक विचार मांडले. त्यांचे विचार आधुनिक होते आणि त्यानुसार त्यांनी केलेली कृती प्रगमनशील आणि सामर्थ्यसंपन्न होती. वंदनीय महाराजांनी ईश्वराला जनताजनार्दनामध्ये बघितले आणि जनतेची सेवा हीच ईश्वराची सेवा समजून त्यांनी समाजाच्या उद्धाराकरिता अविश्रांत श्रम घेतले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यामिश्र व्यक्तिमत्त्वाचे धनी आहेत. त्यांचे जीवन आणि कार्य विश्वसनीय आहे. प्रस्तुत लेखविषयाच्या अनुषंगाने राष्ट्रसंतांचे स्त्रीविषयक विचार समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील '२०वा अध्याय महिलोन्नती' यात स्त्रीविषयक विचार विशेषत्वाने व विस्तृतपणे आलेले आहेत. बालपणी पित्याच्या, तारुण्यात पतीच्या आणि वार्धक्यात पुत्राच्या नियंत्रणाखाली सातत्याने असणाऱ्या स्त्रीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन व्यापक, विशाल आणि उदार अशा स्वरूपाचा असून कालातीत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे समाजजीवनाचे अवलोकन अतिशय सूक्ष्म होते. या सूक्ष्म अवलोकनातून त्यांना समाजजीवनाचे जे दर्शन घडले व स्त्रियांच्या कार्यक्षमतेची जी प्रचीती आली, त्यातून स्त्री ही पुरुषांपेक्षा किंचितही व कशातही कमी नाही, अनुभवाविष्कार त्यांनी आपल्या ग्रामगीतेतील ओवींतून व्यक्त केलेला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या काळाचा विचार केल्यास हा काळ विसाव्या शतकाचा काळ होय. या काळातील सामाजिक स्थित्यंतराचा स्त्रियांवर बऱ्याच प्रमाणात परिणाम झाल्याचे आपणास दिसून येते. प्राचीन काळातील चार भिंतीत बंदिस्त असणारी 'स्त्री' समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत आपल्या कार्यक्षमतेने पुढे येऊ लागली, असा हा काळ. प्राचीन काळापेक्षा या काळात शिक्षणाचा प्रसारही वेगाने वाढला. स्त्री ही जास्तीतजास्त प्रमाणामध्ये केवळ साक्षरच नव्हे, तर सुशिक्षित होऊ लागली. शिक्षणाने त्यांचे जीवन पूर्णतः ढवळून निघाले. शिक्षणामुळे नोकरी - व्यवसायाच्या क्षेत्रांतही त्या सहजच पदार्पण करू लागल्या. विद्यापीठाच्या परीक्षांमध्येदेखील शैक्षणिक गुणवत्तेत स्त्रियांचा दर्जा नेत्रदीपक ठरू लागला. नोकरी- व्यवसायाप्रमाणे राजकारणाचे क्षेत्रही तिने काबीज केले आणि एकेकाळच्या 'अबला' स्त्रीने आता समाजजीवनात 'सबला' म्हणून

ISSN No. 2394-5990

सन्मानाचे स्थान संपादन केले, असा हा काळ म्हणजे विसावे शतक. स्त्रीने या अशा समाजजीवनात वावरताना स्वतःविषयीच्या दुर्बलतेचा तिच्या मनातील न्यूनगंड नाहीसा व्हावा नि प्रसंगी तिला स्वतःच्या संरक्षणासाठी समाजकंटकांचा प्रतिकार करता यावा यासाठी राष्ट्रसंतांनी 'महिलोन्नती' या अध्यायात प्रामुख्याने स्त्री- शक्तिशिक्षण, स्त्रीसंघटना, स्त्रियांचे स्वतंत्र मेळावे, सभा-संमेलने इत्यादींचा आवर्जून पुरस्कार केला आहे. राष्ट्रसंतांच्या मते, समाजजीवनाच्या विकासात स्त्रियांचाही पुरुषांप्रमाणे बरोबरीचा वाटा आहे आणि म्हणूनच कोणताही देश किंवा राष्ट्र स्त्रीजातीला मागे ठेवून प्रगतीपथावर पदार्पण करूच शकत नाही, असे स्पष्ट करतात. ते म्हणतात, स्त्री आणि पुरुष हे परस्परांचा मार्ग अवरुद्ध करणारे घटक नसून परस्परांच्या सहकार्याने परस्परांचा जीवनपथ सुकर करणारे समाजजीवनाचे दोन परस्परावलंबी घटक आहेत. किंबहुना स्त्री-पुरुष हे त्यांच्या मते संसाररूपी रथाची दोन चाके आहेत. भारतीय स्त्रीला हीन दीन लेखणाऱ्या नि हजारो वर्षे तिची उपेक्षा व अवहेलना करणाऱ्या तसेच चार भिंतीआड तिचे जीवन बंदिस्त करून ठेवणाऱ्या समाजाला महाराजांनी स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देताना स्पष्टच सांगितले आहे की,

म्हणोनि रथाची दोन्ही चाके । करावी कातोनि सारखे।
तरिच संसारगाडी सुखे । सुखावेल ग्रामजीवनाची ।।[१]

तुकडोजी महाराजांनी स्त्रीविषयक भूमिकेचा विचार करीत असताना ती संसाररूपी रथाचे एक मजबूत चाक आहे असे स्पष्ट केले. त्यांच्या मते स्त्रीशिवाय संसार म्हणजे आत्मा निघून गेलेली कुडी. समाजजीवनात स्त्री ही माता, पत्नी, प्रणयिनी, भगिनी, सखी अशा विविध रूपांत वावरते व वेगवेगळ्या भूमिकेतून ती पुरुषांच्या जीवनाशी समरस होते. स्त्रीशिवाय संसार असार आहे. स्त्रीच्या रूपातील वात्सल्य कौटुंबिक जीवनात वारंवार उफाळून येते. स्त्रीच्या स्वभावात मृदुता, संवेदनशीलता, भवनाविवशता, सहिष्णुता, संयम आदी गुण अंतर्भूत असल्यामुळे समाजजीवनात वावरताना पुरुषांपेक्षा तिचे आगळे - वेगळे व्यक्तिमत्त्व साकारत असते. स्त्रीशिवाय प्रपंचाला पूर्णत्व येऊ शकत नाही. एकूणच स्त्रीचे कुटुंबातील स्थान महाराज श्रेष्ठ असल्याचे मानतात. स्त्री संसारूपी रथ सुरक्षित चालविण्यासाठी सहकार्य देते. यावरून राष्ट्रसंतांचे स्त्रीविषयक विचार किती कालोचित नि पुरोगामी स्वरूपाचे आहेत हे आपणास लक्षात येते. राष्ट्रसंत पुढे ते म्हणतात की,

समाजी जो पुरुषासि आदर। तैसाचि महिलांसि असावा व्यवहार।।
किंबहुना अधिक त्यांचा विचार। झाला पाहिजे समाजी ।।[२]

स्त्री आणि पुरुष समान असून समाजजीवनात दोन्ही घटकाला सारखाच आदर मिळाला पाहिजे. समाजाने स्त्री-पुरुषसमानतेची भूमिका स्वीकारली नाही तर समाजाची अधोगती होईल अशी त्यांची प्रमुख भूमिका राहिली आहे. ते म्हणतात,

येथेच समाजाचे चुकले। एकासि उचलोनि दुसऱ्यास दाबले।
याचे कटु फळ भोगणे आले। कितीतरी स्थानी।।[३]

पुरुषांबरोबर स्त्रियांना समाजामध्ये दर्जा मिळून समानतेची वागणूक व संधी मिळाली पाहिजे ही महाराजांची प्रमुख भूमिका होती स्त्रियांना समानतेची संधी मिळाली नसल्यामुळे समाजाची प्रगती वेगाने झाली नाही, हे ते प्रकर्षाने नमूद करतात. त्यांचा हा विचार अतिशय प्रगल्भ आणि परिवर्तनवादी आहे. सक्षम पिढी, स्त्री घडवू शकते हा त्यांचा विश्वास होता आणि म्हणूनच जीवनव्यवहारात त्यांनी आईला सर्वश्रेष्ठ मानले आहे

विद्या, गुरुहुनि थोर। आदर्श मातेचे उपकार।।
गर्भापासोनी तिचे संस्कार। बालकांवरी।।[४]

'जशी माता तसा पुत्र ठरतो' हे त्यांचे विचार होते म्हणूनच त्यांनी गर्भवती स्त्रियांना आनंदी ठेवण्याचा आग्रह धरला. स्त्रियांना राष्ट्राविकासात सामावून घेऊन एक नवीन समाज निर्माण करण्याकरिता त्यांचे योगदान, हातभार लावला गेला पाहिजे, हा त्यांचा ध्यास होता. कित्येक वर्षांपासून भारतीय समाजात स्त्री-जातीला 'अबला', 'दुर्बला', 'पशू', 'भोगवस्तू', 'शोभेची बाहुली', 'गुलाम' तसेच 'परमार्थाच्या मार्गातील धोंड' समजणाऱ्या लोकांना राष्ट्रसंतांनी रोखठोक उत्तर दिले. ते म्हणतात,

काय देवे देवता भिन्न केल्या । ऋषि-पत्न्या नव्हत्या सांभाळिल्या?
काय महिलात साध्वी नाही झाल्या?। पहा पुराणी मागच्या।।
काय स्त्रियांनी नाही लिहिले वेद?। नाही केला ब्रह्मवाद?।।
नाना विद्या कला भेद । यात प्रवीण कितीतरी ।।
काय स्त्रियांनी युद्ध नाही केले?। पति-पुत्रा नाही प्रोत्साहन दिले?।।
काय स्त्रियांनी प्राण नाही अर्पिले। ब्रीदासाठी?।।[५]

वरील ओव्यांच्या संदर्भात भाष्य करताना नमिता सेंद्रे असे म्हणतात की, भारतीय स्त्रीने आपल्या जीवनात विविध प्रकारच्या भूमिका सांभाळलेल्या आहेत. सीता, सावित्री, द्रौपदी, मंदोदरी, ह्यांच्यासारख्या साध्वी स्त्रियांनी प्रपंचातही परमार्थ साधला नि अनेक साध्वी स्त्रिया आपल्या पतींच्या ऋषितुल्य जीवनाशी समरस झाल्या. तसेच मैत्रेयी, गार्गी

यांसारख्या स्त्रियांनी वेदलेखन व ब्रह्मवाद करून आपल्या बुद्धिचातुर्याची चुणूकही दाखविली. इतकेच नव्हे तर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, महाराणी पद्मिनी व राणी दुर्गावती यांसारख्या विरांगणांनी रणकौशल्य दाखवून आपल्या वीर प्रवृत्तीचा प्रत्यय आणून दिला ६ यावरून असे लक्षात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी कायमच स्त्रियांचा सार्थ अभिमान बाळगला व त्यांना स्त्रियांच्या कर्तुत्वाची जाण होती. त्यामुळेच सांप्रतकाळी स्त्रियांची होणारी अहवेलना टाळण्याच्या दृष्टीने महाराजांनी साक्षरता गीतातून समाजाला प्रश्नवजा केलेले संसूचन विचार करायला भाग पाडते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महिलांची उन्नती या साक्षरता गीतात म्हणतात की,

स्त्रियेसारखी मोहिनी नाही। स्त्रियेसारखी वैरागिणी नाही ।।
स्त्रियेसारखी मऊ मुलायम नाही। आणि कठोर रणचंडिका नाही।।[७]

यावरून असे लक्षात येते की स्त्री जशी विरांगणा तशीच ती मोहिनीही आहे. विश्वामित्रासारख्या प्रखर तपस्व्याची तपस्या आपल्या मोहाने मिनिटात मातीला मिळविणाऱ्या मेनकेप्रमाणे मोहिनी असलेली स्त्री प्रसंगी कशी रणचंडिकाही बनू शकते याची जाणीव तुकडोजी महाराज करून देतात.

तुकडोजी महाराज यांनी स्त्री समतेचा पुरस्कार केला. ग्रामधर्मात गृहस्थ धर्माचे महत्त्व मोठे म्हणून–

'संसार पंथ न सोडावा । प्रजातंतू न खंडावा।'

असे तुकडोजी स्पष्ट सांगतात. ते संन्यास सांगत नाहीत. त्यांना हवी आहे अनासक्त वृत्ती. संसारात, समाजात, राजकारणात आणि सर्वत्र. त्याचवेळी ते कुटुंब मर्यादित असले तरच संसार सुखाचा होतो' हे सांगायला विसरत नाहीत. बहुपत्नीकत्वाला तुकडोजींचा ठाम विरोध आहे. एकापेक्षा अधिक स्त्रियांशी लग्न ही त्यांना पशुवृत्ती वाटते.

'एकदा एक पत्नी केली। पुढे पत्नीची भाषाच संपली।'

असा त्यांचा निर्वाळा आहे. स्त्री ही त्यांना परमार्गातील धोंड वाटत नाही. उलट तिच्याविषयी त्यांना आदर वाटतो. 'महिलेविण विश्व न चाले' हे शाश्वत सत्य ते सांगतात. 'दोघांचे व्हावे एक मन । तेथेची नांदे स्वर्ग पूर्ण ।' हे संसाराचे रहस्य ते सांगतात. केशवपण, विधवाविवाहबंदी या दुष्ट रूढींचा निषेध ते करतात. एकूणच महाराजांची भूमिका स्त्री समतेच्या पुरस्कार करणारी होती. स्त्रियांच्या संघटना असाव्यात, महिला प्राचारिका असाव्या, सेवा मंडळात महिलांनी मोठ्या संख्येने भाग घ्यावे, अशी महाराजांची भूमिका होती. ते एका पत्रातून स्पष्ट करतात की, भारतीयांनी आपल्या स्त्रियांना, मुलीबाळींना, बहिणींना समाजात वावरण्याला वाव देऊन त्यांचा देशाला फायदा करून देण्याचे श्रेय घ्यावे, झाशीची राणी लक्ष्मीबाईला जर घोड्यावर बसण्याचे ज्ञान नसते, तर ती बहादुरपणाने लढली नसती. देवी अहिल्याबाई होळकर यांना ज्ञान नसते तर करोडो रुपये दानधर्मात गेले नसते. महिलांनी सेवेच्या क्षेत्रात यावे...[८] स्त्रिया संघटित झाल्या पाहिजेत. संघटनाच्या माध्यमातून प्रतिकारशक्ती निर्माण होते, अशी महाराजांची भूमिका होती. स्त्रियांच्या संघटनेसोबतच स्त्रीमेळाव्याचे महत्त्व ते विशद करतात. स्त्रीमेळाव्यातून स्त्रियांच्या अंगी असलेल्या उपजत कलागुणांचा विकास करून त्यांच्या मनाला अन्यायाचा प्रतिकार करण्याचे बळ प्राप्त होते, असे ते म्हणत.

राष्ट्रसंत तुकडोजी महारांजांच्या स्त्रीविषयक विचारातील त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका म्हणजे स्त्री शिक्षणाची. स्त्रीशिक्षणाच्या विविध योजनांचा मुलींनी लाभ घ्यावा, असे त्यांना वाटत होते. मुलींना केवळ उच्च शिक्षण देऊन भागणार नाही तर त्यांचे शिक्षण पुढे संसारोपयोगी ठरावे व समाजसेवेसाठीही त्याचा उपयोग व्हावा. या दृष्टिकोणातून त्यांनी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला.

स्त्री ही पुरुषांपेक्षा कशातही कमी नाही हा विचार तुकडोजी महाराजांनी समाजात सशक्तपणे रुजविण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात त्यांनी पुरुषवर्गाला जोरकस प्रश्न विचारले, ते म्हणतात,

''का म्हणा आबला तिला? ती शक्तिशाली नाही का?
काय कमी देवे दिले, तिज मानवाहुनी सांगना?[९]

असा प्रश्न करून ते स्त्रियांना आवाहन करतात की,

''बाईंनो! अबला म्हणे कुणि, धरुनी त्याच्या मनगटा।
तुकड्या म्हणे सांगा तया, तुज जन्म फुकटचि होई का?''[१०]

तुकडोजी महाराजांनी स्त्रियांना स्त्रियांच्या संदर्भातील मानवविघातक प्रवृत्तीविरुद्ध केलेले आवाहन, स्त्रियांना नवी ऊर्जा प्रदान करणारे आहे. तुकडोजी महाराजांचे एकूणच स्त्रीविषयक विचार स्त्रीसक्षमीकरणाच्या दृष्टीने मौलिक असून त्यांनी मांडलेला विचार आजही समाजाला दिशादर्शक आहे. महाराजांनी स्त्रीविषयी स्वीकारलेली भूमिका मानवी जीवनव्यवहारात स्त्रियांना सक्षम व समान स्थान प्राप्त करून देणारे आहे. महाराजांच्या स्त्रीविषयक विचारांतून समाजजीवनाला नवचेतना प्राप्त झाल्याशिवाय राहत नाही.

**निष्कर्ष :**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या पूर्वकालीन संतांप्रमाणे आणि विचारवंतांप्रमाणे स्त्री ही पुरुषांसारखीच समाजजीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा घटक मानले आहे. तथापि महाराजांनी आपल्या पूर्वकालीनविचारवंतांपेक्षा पुरोगामीत्वाच्या दृष्टीतून स्त्रियांच्या वेगळ्या, स्वतंत्र आणि अस्तित्वसापेक्षा अशा व्यक्तित्त्वाचा पुरस्कार केला आहे.

२. महाराजांनी भारतीय परंपरेतील साध्वी, वीरांगणा यांचे दाखले देऊन व वैज्ञानिक दृष्टिकोणातून बदललेल्या काळाची परिस्थिती लक्षात घेऊन स्त्रीविषयक विचार व्यक्त करून समाजाचे प्रबोधन केले.

३. तुकडोजी महाराजांनी त्यांचा स्त्रीविषयक विचार मानवतावादी जीवनदृष्टीतून व्यक्त केला.

४. तुकडोजी महाराज यांनी स्त्रीजीवनाचे श्रेष्ठत्व मान्य करून पुरुषसत्ताक वृत्तीला विरोध केला आहे.

५. स्त्रिया या बौद्धिकदृष्ट्या पुरुषांपेक्षा कुठेही कमी नसून दोघांनाही शिक्षणाचे समान अधिकार असावे, अशी भूमिका स्त्रीविषयक विचारांमध्ये महाराजांची राहिली आहे.

६. तुकडोजी महाराजांनी स्त्री संघटनेच्या आणि महिला मंडळाचा पुरस्कार केला.

७. तुकडोजी महाराजांच्या स्त्रीविषयक विचारांतून स्त्रियांच्या उन्नतीचा, प्रगतीचा, त्यांच्या गुणांचा, स्त्री विकासाचा व स्त्री शिक्षणाचा विचार स्पष्ट होतो.

८. समाजजीवनाच्या अवलोकनातून महाराजांना समाजजीवनाचे जे दर्शन घडले, त्यातून त्यांना प्रतीत झालेल्या स्त्रीसामर्थ्यविषयक अनुभवाची मांडणी त्यांच्या स्त्रीविषयक विचारातून प्रकट होते.

**संदर्भ :**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, ग्रामगीता, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण, २००३, पृ. क्र. २२१

२. तत्रैव, पृ. क्र. २१९

३. तत्रैव, पृ. क्र. २१९

४. तत्रैव, पृ. क्र. २१३

५. संकलक, केशव मालवणकर, राष्ट्रसंतांची साक्षरता गीते, महिलांची उन्नती, राष्ट्रसंत साहित्य प्रकाशन, शास्त्रीनगर नागपूर, १९९२, पृ. क्र. ३६

६. संपा. अक्षयकुमार काळे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती आणि वाङ्मय, विसा बुक्स, नागपूर, २००८, पृ. क्र. २४२.

७. संकलक, केशव मालवणकर, राष्ट्रसंतांची साक्षरता गीते, उ. नि. पृ. क्र. ३६.

८. संपा. बाबा मोहोड, राष्ट्रसंतांची पत्रे, श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम, सहावी आवृत्ती, २००६, पृ. क्र. ८०

९. संकलक, केशव मालवणकर, राष्ट्रसंतांची साक्षरता गीते, उ. नि. पृ. क्र. ११.

१०. संकलक, केशव मालवणकर, राष्ट्रसंतांची साक्षरता गीते, उ. नि. पृ. क्र. ११.